Reading Passage

## दूध -कुकी

मी सकाळी उठतो. मग आई मला दूध आणि कुकी देते. आई आणि बाबा चहा पितात. पण आई मला चहा देत नाही. आई रोज वरण आणि भात करते. ती भातावर वरण, तूप आणि मीठ घालते. मग ती भात कालवते आणि मला भरवते. हे जेवण मला खूप आवडते.

प्रश्न:

१. मी सकाळी काय काय खातो?
२. आई आणि बाबा काय पितात?
३. आई भातावर काय काय घालते?
४. तुम्हाला जेवताना काय आवडते?
५. आई मला चहा का देत नाही?

## उंदीर

काल घरात एक उंदीर शिरला आणि कपाटामागे गेला. आईने उंदराला पाहिले. ती घाबरली आणि किंचाळली. मी पण घाबरलो. मी बाबांना बोलावले. बाबांनी काठी घेतली आणि उंदरावर मारली. उंदीर बाहेर आला आणि दारातून पळून गेला. मी पटकन दार बंद केले.

प्रश्न:

१. काल घरात कोण शिरले?
२. उंदीर कुठे गेला ?
३. आई का किंचाळली?
४. बाबांनी उंदराला कसे मारले?
५. मी दार पटकन बंद का केले?

Listening Passage

## **<u>शरद आणि लाडू</u>**

काल आईने लाडू केले होते. लाडवांचा डबा उंच फळीवर ठेवला. आणि ती बाहेर गेली. शरदला लाडू हवा होता. तो एका लहान टेबलावर चढला आणि डबा काढायला लागला. डबा हातातून सुटला आणि शरद खाली पडला. शरदच्या पायाला लागले. तो रडू लागला. रडणे ऐकून आई आणि बाबा आले. आईने शरदला लाडू दिला. लाडू खाताना शरद हसू लागला.

प्रश्न:

१. आईने लाडू कुठे ठेवले?
२. शरद कुठे चढला?
३. शरद का रडू लागला?
४. आईने शरदला काय दिले?
५. शरद का हसू लागला?

## **<u>रविवारची सुट्टी</u>**

रविवारची सुट्टी होती. आई म्हणाली, " यश, तुझे कपाट आवर ". यशने कपाट उघडले तर त्याच्या अंगावर दोन चार कपडे पडले. कपाटाच्या वरच्या कप्प्यात असलेला एक मोठा चेंडू यशच्या डोक्यावर पडला. यश हसायला लागला. मग यशने सर्व कपडे, खेळणी आणि वह्या बाहेर काढल्या. पेन्सिली, खोडरबर एका डब्यात ठेवले. मग यश आणि आईनी मिळून सर्व वस्तू नीट कपाटात ठेवल्या. खोलीतला कचरा काढला. मग आई यशला जवळ घेऊन म्हणाली "शाब्बास!”

प्रश्न:

१. यश काय करीत होता?
२. कपाट उघडल्यावर यशच्या अंगावर काय पडले?
३. यशच्या कपाटात काय काय होते?
४. यशने आणि आईने सगळ्या गोष्टींचे काय केले?
५. आई यशला “शाब्बास” का म्हणाली?